# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ U / 244 / 2009 /78 / Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Trimbak S.Kulkarni, Plot No.13,BL/2, Raj Nagar, Station Road, Aurangabad, (Consumer No. 490010229101)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from forwarding of grievance in respect of Shri Trimbak S.Kulkarni Plot No.13,BL/2, Raj Nagar, Station Road, Aurangabad,*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 22.09.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:*
*-*
*Shri Trimbak S.Kulkarni,*
*Plot No.13, BL / 2,*
*Raj Nagar, Station Road,*
*Aurangabad,*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४४/२००९/७८

तक्रार दाखल दिनांक :- ०७/०९/२००९
निकाल दिनांक :- ०३/११/२००९

श्री त्रीबंक एस.कुलकर्णी,
प्लॉट नंबर १३,बी.एल/२,
राजनगर स्टेशन रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०२२९१०१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्र. अ. सगणे | सदस्य/सचिव |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/०९/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २२/०९/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. अर्जदाराचे मीटर दिनांक २५/१२/२००७ रोजी बदलण्यात आले.परंतु महावितरण कंपनीने त्याची नोंद ग्राहाकाच्या सी.पी.एल. मध्ये न घेतल्यामुळे त्यांना डिसेंबर २००७ ते जानेवारी २००९ पर्यंत १३ महीन्याच्या कालावधीत मीटर रिडींग प्रमाणे वीज बिल न देता मीटर फॉल्टी दाखवुन सरासरी ५४ युनिट आकारणीचे देयक देण्यात आले.ग्राहकाने त्यांना देण्यात आलेली सर्व वीज बिल नियमितपणे भरलेली आहेत.माहे फेब्रुवारी २००९ मध्ये ग्राहकाच्या मीटरचे वाचन घेऊन २३१८ युनिटचा एक महीन्यात वापर दाखवुन १६६४४.३० रुपयाचे एकत्रीत वीज बिल देण्यात आले.वरील वीज बिल देतांना २३१८ युनिटचा वीज वापर १३ महीन्यात विभागुन देण्यात यावा व यापुर्वी सरासरी आकारणीची भरलेली देयके समायोजित करण्यात यावी या करीता ग्राहकाने महावितरण कंपनीच्या संबंधित कार्यालयाकडे दिनांक १३/०५/२००,व ०६/०७/२००९ रोजी लेखी तक्रारी दाखल केलेल्या आहेत. परंतु त्या तक्रारीची महावितरण कंपनीकडुन दखल घेण्यात आली नाही त्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे.ग्राहकाने त्यांच्या तक्रार अर्जात वरील प्रमाणे वीज बिलाची दुरुस्ती करुन व्याज व दंडाची रक्कम माफ करुन व झालेल्या मानसीक त्रासापोटी नुकसानभरपाई मिळावी अशी विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २२/०९/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर, छावणी उपविभागाचे सहाय्यक लेखापाल श्री पी.आर. खडके व वीज ग्राहक श्री टी.एस.कुलकर्णी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल.,उपकार्यकारी अभियंता छावणी यांचे पत्र व बिल रिव्हीजन शिट सादर केली त्यानुसार त्यांनी ग्राहकाचा नविन मीटर प्रमाणे झालेला २३१८ युनिट चा वीज वापर १४ महीन्यात विभागणी करुन व ग्राहकाने यापुर्वी भरणा केलेल्या वीज बिलाचे समायोजन करुन १०,४४४.८८ रुपयाचे क्रेडीट ग्राहकास देण्याचा प्रस्ताव सादर केला.नोडल अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव ग्राहकास समजावुन सांगितल्या नंतर तो ग्राहकाने मान्य केल्याने प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

२) दोन्ही बाजुकडुन सादर झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचे मीटर दिनांक २५/१२/२००७ रोजी बदण्यात आले.परंतु त्याची नोंद सी.पी.एल. मध्ये न घेतल्यामुळे ग्राहकाचे मीटर फॉल्टी दाखवुन सरासरी ५४ युनिट प्रति महा याप्रमाणे १४ महीन्यापर्यात वीज बिल आकारणी करण्यात आली.फेब्रुवारी २००९ मध्ये एकत्रीत रिडींग घेवुन २३१८ युनिटचे १६६४४.३० रुपयाचे एक महीन्याचे एकत्रीत वीज बिल ग्राहकास देण्यात आले.ग्राहकाने याबाबत महावितरणच्या संबंधीत विभागाकडे वारंवार तक्रारी केलेल्या आहेत.परंतु त्याची दखल न घेता संबंधीत छावणी उपविभागा तर्फे त्यांना तात्पुरती रक्कम कमी करुन (पार्ट पेमेन्ट) देयक देण्यात आले.ग्राहकाने मंचाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्याचे देयक दुरुस्ती करुन देण्यात आले.ग्राहकाने मंचाकडे दाखल केलेली तक्रार मान्य करण्यात येवुन मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)　महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे फेब्रुवारी २००९ चे वीज देयक रद्द करण्यात येत आहे.त्याऐवजी ग्राहकास २३१८ युनिटचे १४ महीन्यात विभागणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२)　वरील काळात ग्राहकाने यापुर्वी भरलेल्या रकमेचे समायोजन सुधारीत वीज देयकात करावे.

३)　वरील सुधारीत देयकात व्याज व दंडाची आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४४/२००९/७८ दिनांक :-

प्रति,
श्री त्रीबंक एस.कुलकर्णी,
प्लॉट नंबर १३,बी.एल/२,
राजनगर स्टेशन रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०२२९१०१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२४४/२००९/७८** )

आपण दिनांक ०७/०९/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, **मुंबई - ४०० ०५१.**
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.